| MHST080003112008 | **नियमीत दिवाणी दावा क्र.६१/२००८**<br><br>**श्री. साधु सखाराम ननावरे वगैरे**<br>**विरुध्द**<br>**श्री. बापू सखाराम ननावरे वगैरे** |
|---|---|

## निशाणी क्र.१६४ खालील आदेश

सदरचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.१(अ) चे नाव पुन्हा लिहीले आहे ते कमी करण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादी यांच्या म्हणण्यानुसार, दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१(अ) श्रीमती लक्ष्मीबाई बापू ननावरे या मयत झाल्यानंतर निशाणी क्र.१३६ अन्वये दावा दुरुस्तीचा अर्ज देण्यात आला. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येऊन तिचे वारस म्हणून प्रतिवादी क्र.१(अ)(१) बाळू बापू ननावरे यांच्या नावाची नोंद करण्यात आली. परंतु, बाळू बापू ननावरे प्रतिवादी क्र.१(क) म्हणून दाव्यात सामील आहेत. त्यामुळे, दाव्यातील पान क्र.८ वरची दुरुस्ती रद्द करण्यासाठी त्यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०३.** प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र.१(अ)(१) बाळू बापू ननावरे व प्रतिवादी क्र.१(क) बाळू बापू ननावरे या दोन्ही व्यक्ती एकच आहे व त्यांचे नाव दाव्यात दोनदा आले आहे. त्यामुळे, सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

**०४.** प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. तसेच, दावा दुरुस्ती प्रत व दाव्याचे अवलोकन केले. दाव्यातील पान क्र.८ वर प्रतिवादी क्र.१(अ) श्रीमती लक्ष्मीबाई बापू ननावरे मयत असे लिहून प्रतिवादी क्र.१(अ)(१) यांचे नाव बाळू बापू ननावरे असे नमूद केले आहे. तसेच, दाव्यातील पान क्र.२ वर प्रतिवादी

क्र.१(क) बाळू बापू ननावरे यांच्या नावाची नोंद आहे. दोन्ही व्यक्ती एकच असल्याचे दिसून येत आहे. सबब, सदरचा अर्ज मंजूर होणेस पात्र ठरतो. वादी यांनी सदर अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१(अ)(१) ची दाव्यातील पान क्र.८ वरील बाळू बापू ननावरे यांच्या नावाची नोंद ही विहीत मुदतीत कमी करावयाची आहे. म्हणून मी खालीप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणेत येत आहे. |
| २. | वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेली दुरुस्ती विहित कालावधीत करावी व त्याप्रमाणे दुरुस्ती प्रत अभिलेखावर दाखल करावी. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |
| ४. | खर्चाबाबत आदेश नाही. |

SHUBHANGI JAGDISH KATKAR
Digitally signed by SHUBHANGI JAGDISH KATKAR
Date: 2025.03.07 14:42:49 +0530

(श्रीमती एस. जे. कातकर)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
खंडाळा

दिनांकः ०६.०३.२०२५
खंडाळा